संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

जनसंपर्क विभाग

# विद्यापीठात विभागीय रोजगार भरती मेळाव्याचे आयोजन २२ फेब्रुवारीला

## विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन

अमरावती -

विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, माहिती व मार्गदर्शन केंद्र, अमरावती आणि विद्यापीठाचा आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांचे संयुक्त विद्यमाने विभागीय रोजगार भरती मेळाव्याचे आयोजन शुक्रवार, दि. २२ फेब्रुवारी, २०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता विद्यापीठ परिसरातील विद्यार्थी भवन या ठिकाणी करण्यात आले आहे. मेळाव्यामध्ये एकूण अकरा औद्योगिक कंपन्या सहभागी होत असून त्यात एकूण १५०५ पदे उपलब्ध करण्यात आली आहे.

मेळाव्यामध्ये दहावी, बारावी, आय.टी.आय., एम.सी.व्ही.सी., पदवीधर, एम.बी.ए., एम.बी.ए. अंतीम वर्षातील पात्र विद्यार्थी व बी.ई. शैक्षणिक अहर्ताधारक बेरोजगार उमेदवारांनी ऑनलाईन सेवायोजन कार्ड, निवडणूक ओळखपत्र / आधारकार्ड, शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या प्रती, ४ पासपोर्ट फोटो, बायोडाटा व परीक्षेसाठी लागणारे आवश्यक साहित्यासह उपस्थित रहावयाचे आहे.

उमेदवारांनी सविस्तर माहिती जाणून घेण्यासाठी व ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. विभागीय रोजगार भरती मेळाव्याचा विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त संख्येने लाभ घेण्याचे आवाहन विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, माहिती व मार्गदर्शन केंद्र, अमरावतीच्या सहाय्यक संचालक श्रीमती प्रांजली बारस्कर व आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले आहे. काही अडचण असल्यास उमेदवारांना दूरध्वनी क्रमांक ०७२१-२६६२३०६ यावर संपर्क साधता येईल.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १९/०२/२०१९.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी